विभागप्रमुख म्हणून घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक:आयटीआय-१०९६/[२९३]/व्यशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १८, जुलै, १९९६.

पहा:= १] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. इएक्सएम-७३८६/५३२१६/९०१/तांशि-४, दिनांक १५ ऑक्टोबर, १९८६
२] संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १८/नियोजन/१९९५/अव्यपमं/[२३२]/४१०१४, दिनांक २८ सप्टेंबर, १९९५.

शासन निर्णय:= व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या अभ्यासक्रमांकरिता परिक्षा घेण्यासाठी संदर्भाधीन दिनांक १५ ऑक्टोबर, १९८६ च्या आदेशान्वये व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळाचे अध्यक्षांना विभागीय प्रमुखाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. शासन आता अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, मुंबई यांना "विभाग प्रमुख" म्हणून घोषित करण्यास मान्यता देत आहे.

२. हे आदेश, वित्तिय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-एक मधील अनुक्रमांक-१, नियम क्रमांक २ अनुसार प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अं.अ.कारखानीस

[ अं. अ. कारखानीस ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत- संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
महालेखापाल-[लेखापरिक्षा] महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
वित्त विभाग [विनियम], मंत्रालय, मुंबई,
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, सर्व कार्यासने,
निवड नस्ती, व्यशि-१.